महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

==================================================================

जावक क्रमांक – ३१०४/४६ दिनांक :- १९ ऑगस्ट, २०२४

**प्रसिद्धिपत्रक**

# म्हाडा सोडतीसाठी अर्ज करण्याकरिता म्हाडाचे अधिकृत संकेतस्थळ व ॲपचाच वापर करावा

म्हाडा सोडत ऑनलाईन अर्ज प्रक्रियेबाबत माहिती देण्यासाठी आयोजित लाईव्ह वेबिनारद्वारे मुंबई मंडळाचे आवाहन

मुंबई, दि. १९ ऑगस्ट, २०२४ :- म्हाडा मुंबई मंडळाच्या २०३० सदनिकांच्या विक्रीसाठी आयोजित ऑनलाइन संगणकीय सोडतीकरिता अर्ज करण्यासाठी https://housing.mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळाचा व MHADA HOUSING LOTTERY SYSTEM या ॲपचाच वापर करावा, असे आवाहन मुंबई मंडळातर्फे आज आयोजित लाईव्ह वेबिनारमध्ये करण्यात आले.

मुंबईतील विविध गृहनिर्माण प्रकल्पांतील २०३० सदनिकांच्या विक्रीसाठी दि. ०९ ऑगस्ट २०२४ पासून म्हाडाचे संकेतस्थळ https://housing.mhada.gov.in व मोबाइल ॲपद्वारे ऑनलाईन अर्ज नोंदणी व अर्ज स्वीकृती प्रक्रियेला प्रारंभ झाला आहे. म्हाडाच्या ऑनलाईन संगणकीय सोडतीसाठी अर्जदारांना अधिक सुलभतेने अर्ज सादर करता यावा, याबाबत मार्गदर्शनासाठी व इच्छुक अर्जदारांच्या शंका निरसनासाठी म्हाडा मुंबई मंडळातर्फे आज आयोजित ऑनलाइन वेबिनार उत्साहात पार पडला. या वेबिनारमध्ये 'म्हाडा'चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल वानखडे, मुंबई मंडळाचे उपमुख्य अधिकारी (पणन) श्री. राजेंद्र गायकवाड, मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी श्रीमती सविता बोडके, माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी श्री. संदीप बोदेले यांनी सोडत अर्ज प्रक्रियेविषयी माहिती दिली व इच्छुक अर्जदारांच्या प्रश्नांना उत्तरे दिली.

यावेळी श्रीमती बोडके म्हणाल्या की, म्हाडाच्या राज्यातील गृहनिर्माण प्रकल्पातील सदनिकांच्या विक्रीकरिता IHLMS 2.0 (Integrated Housing Lottery Management System) ही नूतन संगणकीय सोडत प्रणाली तयार करण्यात आली आहे. सदनिकेसाठी अर्ज करण्यापासून ते ताबा मिळेपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानानेयुक्त ही सोडत प्रक्रिया मानवी हस्तक्षेपविरहीत असून सोडत आज्ञावली अधिक पारदर्शक, सुलभ आणि सुरक्षित आहे. यावेळी श्रीमती बोडके यांनी अर्ज नोंदणी, अर्ज स्वीकृती, अनामत रकमेचा भरणा करणे या प्रक्रियेबाबत सादरीकरणासह माहिती दिली. अर्ज नोंदणी करताना इच्छुक अर्जदाराचा मोबाइल नंबर आधारशी लिंक असणे गरजेचे आहे. नोंदणी करतेवेळी अर्जदाराला digilocker या ॲपमध्ये स्वत:सह पती/पत्नीचे आधार व पॅन कार्ड अपलोड करून ते लिंक करणे आवश्यक आहे. यामुळे म्हाडाला पडताळणी केलेली कागदपत्रे मिळणार आहेत. अर्जदाराने दि. ०१ जानेवारी २०१८ रोजी नंतर जारी केलेले व बार कोड असलेले महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र

(Domicile Certificate) अपलोड करणे आवश्यक असल्याचे श्रीमती बोडके यांनी सांगितले. MHADA HOUSING LOTTERY SYSTEM हे ॲप अद्ययावत करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

श्री. गायकवाड म्हणाले की, अर्ज भरतेवेळी विवाहित अर्जदारांनी विहित ठिकाणी विवाहित म्हणूनच नमूद करणे गरजेचे असून तसे न केल्यास व निदर्शनास आल्यास सोडतीत विजेती सदनिका नाकारण्यात येऊ शकते. घटस्फोटीत अर्जदारांना सदनिका ताब्यात देतेवेळी डिक्री सादर करावी लागणार आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती या प्रवर्गातील अर्जदारांनी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे गरजेचे आहे. जात वैधता प्रमाणपत्र नसेल तर सदनिकेचा ताबा घेण्यापूर्वी सदर प्रमाणपत्र अर्जदारास सादर करावे लागणार आहे.

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत उपलब्ध घरांसाठी अर्ज करण्याकरिता योजनेच्या पोर्टलवर नोंदणी करणे गरजेचे आहे. नोंदणी नसल्यास विजेत्या अर्जदारास सोडत पश्चात नोंदणी म्हाडा करून देणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न सहा लाख रुपयांपेक्षा कमी असावे तसेच पती-पत्नी यांच्या नावे देशात कुठेही पक्के घर नसणे गरजेचे असल्याचे श्री. गायकवाड यांनी सांगितले.

अर्ज करतेवेळी उत्पन्नाचा पुरावा म्हणून आर्थिक वर्ष २०२३-२४ चे आयकर विवरण पत्र सादर करणे गरजेचे असून यावर्षी सोडत प्रणालीत अर्जदाराने त्याचा आयकर खात्याचा पासवर्ड देणे आवश्यक आहे. तसेच आयकर खात्याला Two step verification लावलेले असेल तर ते अर्ज प्रक्रिया होईपर्यंत काढून टाकण्याचे आवाहन श्री. गायकवाड यांनी केले. अर्जदाराने एकूण उत्पन्न नमूद करताना आयकर विवरण पत्रातील एकूण उत्पन्न रक्कम नमूद करण्याची सूचना श्री. गायकवाड यांनी केली. म्हाडाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेली माहितीपुस्तिका बारकाईने वाचण्याचे आवाहनही त्यांनी केले. म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in काही नेहमी विचारल्या जाणाऱ्या संभाव्य प्रश्नांची उत्तरे टाकली आहेत, त्याचेही अवलोकन करण्याचे आवाहन श्री. गायकवाड यांनी केले.

म्हाडाचे अधिकृत यूट्यूब चॅनल व फेसबुक पेज @mhadaofficial वरून या वेबिनारचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. सदर प्रक्षेपण सुमारे ४५०० नागरिकांनी लाईव्ह बघितले.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial


म्हाडा
MHADA

**Maharashtra Housing & Area Development Authority**

Public Relations Department

Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

=================================================================

Outward No. 3104/46 Dt. 19/08/2024

**Press Release**

# MHADA Urges Applicants to Use Official Website and App for applying Mumbai Board Lottery

Mumbai Board Hosts Live Webinar to Guide Applicants Through the Online Lottery Process

Mumbai, August 19, 2024: The MHADA Mumbai Board has reiterated the importance of using only the official website https://housing.mhada.gov.in and the "MHADA HOUSING LOTTERY SYSTEM" mobile app for submitting applications for the upcoming sale of 2,030 flats. This was the key message delivered during a live webinar held today by the Mumbai Board, aimed at guiding potential applicants through the online lottery process.

From August 9, 2024, MHADA's official website and app have been open for online registration and submission of applications for various housing projects across Mumbai. Recognizing the need for clarity and support, MHADA organized this webinar to walk applicants through the application process and address any concerns they might have. The session was led by senior officials, including MHADA's Deputy CEO Mr. Anil Wankhade, Mumbai Board's Deputy Chief Officer (Marketing) Mr. Rajendra Gaikwad, Chief Information and Communication Technology Officer Mrs. Savita Bodke, and ICT Officer Mr. Sandeep Bodele. They provided comprehensive guidance on the application process and responded to participants' inquiries.

Mrs. Bodke highlighted MHADA's adoption of the Integrated Housing Lottery Management System (IHLMS 2.0), a cutting-edge, computerized system designed to ensure transparency and ease throughout the application process. "This state-of-the-art system is fully online and no human intervention, making the lottery process more transparent, accessible, and secure," she explained. She also detailed the steps for application registration, submission, and payment, emphasizing the need for applicants to link their mobile numbers to Aadhaar and upload Aadhaar and PAN cards for both themselves and their spouses via the Digilocker app. Mrs. Bodke stressed that only

Maharashtra state domicile certificates issued after January 1, 2018, with a barcode, will be accepted.

Addressing the nuances of the application process, Mr. Gaikwad urged married applicants to accurately reflect their marital status when filling out their forms. "Any discrepancies in marital status may lead to the cancellation of the allotted flat," he warned. He also clarified that divorced applicants will need to present their decree at the time of possession. For applicants from Scheduled Castes, Scheduled Tribes, Nomadic Tribes, and De-Notified Tribes, the submission of caste certificates and caste validity certificates is required at the time of application. He added, "If a caste validity certificate isn't available at the time of application, it must be presented before the flat is handed over."

Mr. Gaikwad also outlined the eligibility criteria for those applying under the Pradhan Mantri Awas Yojana (Urban). "Applicants must register on the scheme's portal to be eligible," he said, adding that MHADA would assist winners with the registration process if not completed beforehand. He emphasized that the annual household income should be under six lakh rupees, and neither the applicant nor their spouse should own a permanent house anywhere in India.

To further streamline the process, Mr. Gaikwad noted that applicants must submit their income proof of FY 2023-24 Income Tax Return (ITR) and provide their ITR account password. "If two-step verification is enabled on the ITR account, it should be disabled temporarily until the application process is complete," he advised. He encouraged applicants to accurately state their total income as per the ITR and thoroughly review the information brochure available on MHADA's website. The website also features answers to frequently asked questions (FAQs) to assist applicants.

The webinar was broadcast live on MHADA's official YouTube channel and Facebook page @mhadaofficial, attracting over 4,500 viewers.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer/ MHADA

---

**Follow us on :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial